# 'मेट्रो ३'च्या भुयारीकरणाचा १९ वा टप्पा पूर्ण



**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ या 'मेट्रो -३' भुयारी मार्गिकेवरील भुयारीकरणाच्या एकोणिसाव्या टप्प्याचे काम गुरुवारी पूर्ण झाले. 'सूर्या १' हे टनेल बोअरिंग मशिन (टीबीएम) विधानभवन ते चर्चगेट हे विधानभवन दरम्यानचे ४९९ मीटरचे भुयार पूर्ण करून गुरुवारी सकाळी ११.१५ वाजता बाहेर आले. भुयारीकरणाच्या या कामामुळे 'मेट्रो ३'च्या एकूण भुयारीकरणापैकी ६४ टक्के काम पूर्ण पूर्ण झाले आहे.

सुमारे ७०० टन वजनाचे सूर्या १ हे टीबीएम यंत्र तब्बल ९० दिवस भुयारीकरणाचे काम करत होते. दरदिवशी ५.५ मीटर भुयारीकरणाचे काम या यंत्राद्वारे पूर्ण करण्यात आले. पॅकेज एकमधील हा तिसरे भुयार असून या टप्प्यात अजून सात भुयारे करण्याचे काम बाकी आहे. भुयारीकरणासाठी सध्या १७ टीबीएम यंत्रे कार्यरत आहेत. टीबीएम यंत्रे उतरवण्यासाठी मार्गिकेवरील भाड ठिकाणी मोठी विवरे (लाँचिंग शाफ्ट) खोदण्यात आले आहेत.